मंगळवार दि.११ मार्च २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१७७ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


## महाराष्ट्रात ५ वर्षात ७१ लाख रोजगार

# नव्या औद्योगिक धोरणातून ५० लाख रोजगार तयार होणार; अर्थसंकल्पातून अजित पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आगामी काळात महाराष्ट्रात ७१ लाख ७ हजार ५०० इतकी रोजगार निर्मिती होईल, असा आशावाद सोमवारी अर्थमंत्री अजित पवार यांनी आपल्या अर्थसंकल्पातून व्यक्त केला. दावोस गुंतवणुकीतून सुमारे १६ लाख, महाराष्ट्राचे महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक २०२५ मधून ५० लाख, तर लॉजिस्टिक धोरणातून ५ लाख आणि गडचिरोली जिल्ह्यातल्या स्टील हबमधून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होईल, असे पवार म्हणाले.अजित पवार म्हणाले, गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, २०२५ मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण ६३ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात १५ लाख ७२ हजार ६५४ कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे १६ लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे.

महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांसाठी १०० दिवसांचा सात कलमी कृती आराखडा तयार करण्यात आला. या कृती आराखड्यात संकेतस्थळांचा विकास, सुलभ जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयीसुविधा, गुंतवणुकीचा प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदींचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमामुळे प्रशासन कार्यक्षम, पारदर्शक, गतिशील, लोकाभिमुख होऊन राज्य प्रगतीच्या शिखरावर जाईल, याची खात्री आम्हाला आहे.या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन



त्रयस्थ संस्थांकडून करवून घेऊन उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यालयांचा गौरव करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम निरंतर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण २०२५ लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. त्या धोरणाच्या ५ वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व ५० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट असेल. नवीन औद्योगिक धोरणाबरोबरच अवकाश व संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण, इलेक्ट्रॉनिक्स धोरण, जेम्स न्ड ज्वेलरी धोरण, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम धोरण, चक्रीय अर्थव्यवस्थेसाठी स्वतंत्र क्षेत्रीय धोरण जाहीर करण्यात येणार आहेत.सन २०२३–२४ मध्ये एकूण ५ लाख ५६ हजार ३७९ कोटी रुपयांची व सन २०२४–२५ मध्ये नोव्हेंबर, २०२४ पर्यंत ३ लाख ५८ हजार ४३९ कोटी रुपयांची उत्पादने निर्यात करण्यात आली आहेत. राज्याचे लॉजिस्टिक धोरण–२०२४ जाहीर करण्यात आले असून त्याद्वारे १० हजार एकराहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येणार आहेत. प्रकल्पांना देऊ केलेल्या विशेष प्रोत्साहन व सुविधांमुळे सुमारे ५ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांची निर्मिती होणार आहे.एकेकाळी नक्षलग्रस्त म्हणून ओळखला जाणारा गडचिरोली जिल्हा आता स्टील हब म्हणून उदयास येत आहे. दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये गडचिरोली जिल्ह्याकरिता २१ हजार ८३० कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ७ हजार ५०० रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.गडचिरोली जिल्ह्यातील दळणवळणासाठी खनिकर्म महामार्गांचे जाळे विकसित केले जात असून त्याकरिता पहिल्या टप्प्यात सुमारे ५०० कोटी रुपये किंमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. समतोल प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सामूहिक प्रोत्साहन योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सन २०२५–२६ मध्ये ६ हजार ४०० कोटी रुपये प्रोत्साहन अनुदान प्रस्तावित आहे.


# उस्माननगर येथील पाणी पातळी खाली गेल्याने नागरिकांची भटकंती सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

उस्माननगर येथील जमिनीतील पाण्याची पातळी खोलवर गेल्याने हातपंप व बोअरला पाणी मिळत नसल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंतीस सुरूवात झाली असून जिवन प्राधिकरण पाणीपुरवठा योजनेच्या व लोकप्रतिनिधींच्या कार्यप्रणाली वर नागरिक नाराजी व्यक्त करत आहेत.

उस्माननगर हे तालुक्यातील सर्वात मोठे गाव म्हणून ओळखले जाते. येथे मागील अनेक वर्षांपासून पाणी टंचाई अद्याप सुटलेली नाही. कोट्यावधी रुपये खर्च करून देखील येथे पाणीपुरवठा योजना पुर्णत्वास नेली नाही. उस्माननगर ची पाणी टंचाई म्हणले की , मागील इतिहास



डोळ्यासमोर उभा राहतो. येथील नागरिकांची पाण्यासाठी वणवण भटकंती , येथील पाणी टंचाईच्या काळात गेलेले तरूण व काही चाळीसी मधील नागरिकांच बळी विसरता येणार नाही. अमिर खान यांच्या सत्य मेव जयते या टि व्ही शो कार्यक्रमाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र हादरला होता. येथील जनता पोटाची खळगी भरण्यासाठी बाहेर गावी जातात. कामे संपली गावाकडे येतात. अंदाजे ऐंशी ते नव्वद टक्के जनता गावातच राहुन मिळेल ते काम करून असते. ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असते. जमिनीची पाण्याची पातळी खोलवर गेल्याने हातपंप, आड , बोअरला पाणी मिळत नाही. म्हणून नागरिक मिळेल तिथून पाणी आणत आहेत. पंधरा वर्षा झाले संयुक्त पाणी पुरवठा योजना मंजूर होऊन पण ही योजना जैसे थे आहे.

# मरखेल येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश व सदस्य नोंदणी मेळावा संपन्न

## येणाऱ्या काळामध्ये गोजेगावकरांना आपण आमदार म्हणून पाहू–लोकनेते प्रतापराव पाटील चिखलीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर तालुक्यातील मरखेल येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महाराष्ट्र राज्याच्या वतीने अजित पर्व सदस्य नोंदणी अभियान व पक्षप्रवेश सोहळा मोठ्या हर्षवल्लसात झाला आहे. यावेळी बोलताना आमदार चिखलीकर यांनी उपस्थित असलेल्या हजारो लोकांना आश्वासित केले की येणाऱ्या काळामध्ये व्यंकटराव पाटील गोजेगांवकर हे आमदार होतील असे म्हटले आहे या



कार्यक्रमाच्या वेळी मार्केट कमिटीचे संचालक तथा माळेगाव ग्रामपंचायत चे सरपंच शिवराज बस्वराज पाटील माळेगावकर , देगलूर येथील पत्रकार नरसिंग तुकाराम अन्नमावार तसेच तालुक्यातील मरखेल गावचे उपसरपंच संदीप किशनराव पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला अवघ्या काही दिवसांत व लवकरच भास्करराव पाटील खतगावकर व अनेक दिग्गज नेते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याचेही सांगितले आहे. या कार्यक्रमाला मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परिसरातून व देगलूर तालुक्यातील हजारो लोकांची उपस्थिती होती.

# साठे महाविद्यालयात जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबिराचा उद्घाटन सोहळा संपन्न

## परिस्थितीशी संघर्ष करीत जीवन जगले पाहिजे–डॉ.नेटके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

आपण जीवन जगत असताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.परिस्थितीशी संघर्ष करीत यश डोळ्यापुढे ठेवून विद्यार्थ्यांनी कष्ट केले पाहिजे. विद्या ग्रहण करताना अडचणी येतात म्हणून शिक्षणाकडे दुर्लक्ष न करता शिक्षण घेतले पाहिजे. जिद्द, चिकाटी आपल्या अंगी असेल तर नक्कीच आपणाला यश मिळते. असे उदगार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे ओएसडी डॉ. दिगांबर नेटके यांनी व्यक्त केले.

येथील शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि साठे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने ' नांदेड जिल्हा जिल्हास्तरीय युवक – युवती नेतृत्व विकास शिबिराचा' उद्घाटन सोहळा संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. दिगांबर नेटके बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर तोटरे होते. संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, प्राचार्य डॉ. हरिदास राठोड, उप प्राचार्य तथा कार्यक्रमाधिकारी प्रा. संजीव डोईबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी डॉ. मल्लिकार्जुन करजगी म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करते. या योजनेला तुटपुंजे मानधन असतानाही आपल्या विद्यार्थ्यांच्या अंगी सेवाभाव निर्माण व्हावा, त्यांच्यातील नेतृत्वगुणांना वाव मिळावा या पवित्र भावनेतून हे कार्य चालू आहे. याप्रसंगी प्राचार्य हरिदास राठोड यांनीही विद्यार्थ्यांना



मार्गदर्शन करताना त्यांनी आपल्या जीवनातील अनेक प्रेरणादायी अनुभव सांगितले. अध्यक्षीय समारोहात प्राचार्य डॉ. मनोहर तोटरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थी जीवनात आपण जे काही नवनवीन गोष्टी शिकतो त्या आपणाला पुढील आयुष्याला प्रेरणा देणाऱ्या असतात. वाटा निर्माण करणाऱ्या असतात. म्हणून आपण अशा शिबिरातून अनेक अनुभव स्वतः घ्यावेत आणि तुम्हाला उपलब्ध करून दिलेल्या व्यासपीठाचा पुरेपूर फायदा करुन घ्यावा.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. संजीव डोईबळे यांनी केले. प्रस्ताविकात त्यांनी रासेयो म्हणजे व्यक्तिमत्व विकास होय. या शिबिरातून तुम्हाला खूप शिकायला मिळेल आणि तुमच्यातील कलागुणांना सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. केशव पाटील यांनी तर आभार प्रा. एम एस सगरोळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. अश्विनी बावस्कर, डॉ. राम धारासुरकर, प्रा. अण्णाराव मुंडे, डॉ. महावीर उदगीरकर, डॉ. स्वानंद मुखेडकर, व्यंकट पांचाळ, प्रकाश राठोड, संजय सकनुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.







# तडजोड करणे म्हणजे दुबळेपणा नव्हे–असावरी काकडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरूर कासार । वार्ताहर**

पुरूषांना आर्थिक सत्ता मिळाल्याने तो श्रेष्ठ ठरला. सृजन कधीच दुय्यम नसते व ते कार्य स्त्री करते पण त्यातून अर्थार्जन होत नसल्याने ते कमी प्रतीचे मानले गेले त्यामुळेच पुरुषांचे मोठे नुकसान झाले आहे. स्त्री वा पुरूष होण्याआधी सर्वांनी माणूस होणे आवश्यक असून स्त्री पुरूष समानता म्हणजे सहअस्तित्व होय. समाजात घटस्फोटांचे वाढते प्रमाण ही चिंताजनक बाब आहे असे प्रतिपादन पुणे येथील जेष्ठ कवयित्री असावरी काकडे यांनी केले. एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य द्वारा जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित ३७ व्या राज्यस्तरीय ऑनलाईन एकता काव्य संमेलनात अध्यक्ष म्हणून त्या बोलत होत्या. संमेलनाचे उद्घाटन माध्य.व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ संभाजीनगर च्या सचिव डॉ.वैशाली जामदार यांनी केले.

एकताचे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, प्रदेश संघटक देवीदास शिंदे, प्रदेश युवक सरचिटणीस बलराम मनिठे, प्रवक्ता मल्हारी खेडकर, विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ.प्रकाश वाकळे, परभणी महानगरीय अध्यक्षा प्रा.शोभाताई घुंगरे, परभणी जिल्हा उपाध्यक्षा मेघा नांदखेडकर, एकता हिंदी मंच महिला आघाडी प्रमुख नेहा कुमावत, नांदेड जिल्हाध्यक्ष एड.सुचिता गिते, शेवगाव तालुकाध्यक्ष प्रदीप बोडखे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या कविसंमेलनाची सुरुवात असावरी काकडे यांच्या दर्जेदार रचनांनी



झाली. धाराशीव च्या डॉ.वंदना जाधव यांनी 'रूपे तुझी' व 'प्रेरणा तुझी' या स्त्रीवादी रचना सादर करून रसिकांना अंतर्मुख केले. वासंती वैद्य (पुणे) यांच्या 'माझी लेक' व 'तिसरा नेत्र' या कवितांना भरघोस प्रतिसाद मिळाला. 'म्हैस' व 'आई' या दर्जेदार रचना पेश करत नागपूर च्या अनुपमा मुंजे यांनी महोल बदलून टाकला तर सिंधुदुर्ग येथील साधना सुर्यवंशी यांनी 'झुंजणारी नार हो' व तिची लढाई' या हटके कविता ऐकवून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. वर्षा चोभे (चंद्रपूर) यांनी 'सावित्रीचा अंश' व 'ग पोरी' या स्त्रीत्वाचा हुंकार प्रगट करणाऱ्या रचना पेश केल्या तर पिंपरी चिंचवड च्या प्रिया निफाडकर यांच्या 'यशस्वी माघार' व 'भवताल' या कवितांनी धमाल उडवून दिली तद्नंतर बीड ची युवा कवयित्री साक्षी मुंडे हिने 'हिरणी' हिंदी रचना व 'बाईपण' कविता सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रात्री १० वाजेपर्यंत रंगलेल्या या काव्य संमेलनाचे बहारदार सूत्रसंचालन लातूरच्या कवयित्री अनिता येलमटे यांनी केले.

एकता महिला आघाडीच्या श्रीम.लता बडे–कराड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक तर बालमटाकळी जि.अहिल्यानगर येथील सौ.मिना देवीदास शिंदे यांनी आभार प्रदर्शन केले. काव्य संमेलनात अजय मुंजे, आकांक्षा जावळे, भारती सुदामे, दादाराव वाल्हेकर, आरती कोराळे, जयराम मुसळे, जयंत सुदामे, कार्तिक कांबळे, मनमोहन खेडकर, प्रज्ञा निफाडकर, प्रमोद निफाडकर, श्रीनिवास काकडे, वैशाली लेले, उमा व्यास, वसंत वैद्य, दिपक पाठक, विद्या सुर्यवंशी, अशोक तिडके, कृष्णकांत मिसाळ, वनिता जंगले, पंडित वराडे, मिनाक्षी मुंडे, डॉ.एकनाथ फुटाणे, स्नेहा मिरजकर, अनिता वलांडे, प्राजक्ता निफाडकर, जालिंदर साळुंके, रोहन धोटे, संदीप मुंडे, स्मिता गोडबोले यांनी उपस्थिती लावली.

# फुलवळ येथील संदीप देवकांबळे यांची महसुल साहाय्यक पदी निवड!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार म्हटल्यावर डोळ्यांसमोर उभे राहते ते डोंगरदऱ्यात असलेला कंधार तालूका.मौजे फुलवळ,ता.कंधार येथील संदीप देवकांबळे यांची आपल्या आर्थिक हालाखीच्या परिस्थितीवर मात करुन एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन महसुल साहाय्यकपदी निवड झाली आहे,

फुलवळ नगरीतील शासकीय गुत्तेदार माधवराव पटणे,नामदेवराव पटणे वैजनाथ सादलापुरे,ग्रामपंचायत च्या वतीने सरपंच विमलबाई मंगनाळे,सदस्य चंदबस मंगनाळे,पत्रकार मधुकर डांगे, धोंडीबा बोरगावे,सरपंच प्रतिनिधी नागनाथ मंगनाळे,यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले,

संदीपने चार वेळा परीक्षेस सामोरे जावून प्रयत्न केला पण पाचव्यांदा यश आले. फुलवळचा पहीलाच एमपीएसीचा मानकरी ठरला आहे. फुलवळ या गावांतील संदीप मुकुंद देवकांबळे यांचे शिक्षण जि.प. प्राथमिक फुलवळ येथे झाले, माध्यमिक शिक्षण जगदंबा हायस्कुल माहुर येथे झाले आणि पदवीचे शिक्षण धर्माबादच्या महाविद्यालय झाले.असा शैक्षणिक प्रवास करत त्यांनी आपले शिक्षण पुर्ण केले व त्यांनी एमपीएससी परीक्षेच्या तयारीला लागला,त्यांनी एमपीएससी तयारी घरी बसुनच केली. पाच वर्षापासुन तो तयारी करत होता चार वेळा त्यांना अपयश आल पण खचला नाही, सतत अभ्यास करायचा आणि पाचव्यादा त्यांनी यश संपादन केले. नुकतीच त्यांची महसुल सहाय्यक पदी निवड झाली संदीप यांचे वडील चौथी पास तर आई विमलबाई



देवकांबळे ही अंगठे बहाद्दर असुन तिनं आपल्या मुलाला शिकवायचं अन् मोठ्ठा साहेब बनवायचं! अस त्या मातेच जीवनातील स्वप्न होते,आमच्याशी बोलतांना विमलबाई म्हणाल्या आम्ही रोज एकाच्या शेतात मजुरीन जायचं राबराब राबायचं! हे आपल्या लेकराच्या नशीबी येऊ नये म्हणुन कष्ट करुन घामाच्या वगळाने रोज आंघोळ व्हायची!पण लेकराचे शिक्षण पुर्ण केले, एक मोठा मुलगा तुकाराम हा माध्यमिक शिक्षक या पदावर नौकरी करत आहे,तर दुसरा संदीप मुकुंद देवकांबळे यांनी एमपीएससी मधुन महसुल साहाय्यक पदी निवड झाली आहे,माझ्या कष्टाचे फळ मला मिळाले! असल्याचे संदीप देवकांबळे यांच्या आई सौ.विमलबाई देवकांबळे यांनी सांगितले संदीपचे वडील यांचे शिक्षण चौथी पर्यत झालेले असुन वडीलांनी ही जीवनातील अनेक वर्ष मजुरी केली,चालक म्हणुन काही दिवस गावातीलच शासकिय गुत्तेदार कै.दिगंबरराव पटणे यांच्या कडे काम केले काम करत असताना मला एक सरकारी चालक या पदासाठी नौकरीची संधी मिळाल्याचे मुंकद तुकाराम देवकांबळे यांनी सांगितले आज माझे दोन्ही मुलं सरकारी नौकरीला लागल्याचा मला अभिमानाने सांगावे वाटते कष्ट करा जिद्द बाळगा यश आपोआप मिळते,असे संदीप देवकाबळे यांनी सांगितले,

# दिल्ली येथे सरपंच संतोष पाटील यांना उत्कृष्ट सरपंच पुरस्कार प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । धनाजी जोशी**

तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी गावचे सरपंच संतोष पाटील यांना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतभूषण उत्कृष्ट सरपंच २०२५ हा पुरस्कार जाहीर झाला होऊन काल रविवारी ९ मार्च रोजी दिल्ली येथील एका कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.काल.रविवारी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन मधील भव्य सभागृहात सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सरपंच संतोष पाटील यांनी आपल्या गावात केलेल्या उल्लेखनीय कार्याची तसेच विविध विकास कामांची दखल घेऊन दि.९ मार्च रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले,यावेळी लोकसभा खासदार बळवंत वानखडे,माजी राज्यपाल कमलताई गवई आदी उपस्थित होते.नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये अतिथी म्हणून तालुक्यातील येरगी गावचे सरपंच



संतोष पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबांमधील सरपंच संतोष पाटील यांनी विविध उपक्रम राबवत आदर्श व उपक्रमशील ग्रामपंचायत बनवली आहे. त्यांच्या संकल्पनेतून गावातील पुढची पिढी सजग, सक्षम,निर्व्यसनी निरोगी व सज्ञान बनवण्याच्या दृष्टीने तसेच बालिका पंचायत राज व इतर मुली,युवतींना स्वसंरक्षणाचे धडे देत त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी केलेले प्रयत्न,गावात स्वच्छता अबाधित राहण्यासाठी आजतागायत चालू असलेले कार्य,गावाला स्मार्ट व्हिलेज बनवण्यासाठी चे कार्य अशा विभिन्न कार्यामुळे संतोष पाटील यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.संतोष पाटील यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे देगलूर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# देगलूर उपजिल्हा रुग्णालयात ताण तणाव निवारण शिबिराचे आयोजन




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

श्री गुरु गोबिंदसिंघजी स्मारक जिल्हा सामान्य रूग्णालय नांदेड च्या वतीने मा.जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम व प्रेरणा प्रकल्प शेतकरी समुपदेशन व आरोग्य सेवा कार्यक्रम यांच्या सौजन्याने आज एक दिवसीय दिनांक ११ मार्च २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता पासून ते दुपारी १:०० वाजता पर्यंत उपजिल्हा रुग्णालय देगलूर येथे ताण तणाव निवारण व मानसिक आरोग्य शिबिराचेआयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात मानसिक समस्या व आजार चिंता, नैराश्य, झोप न येणे,व्यसनाधीनता, जुनाट डोकेदुखी, झटके येणे, करणी,भानामती, स्किझोफ्रेनिया, काल्पनिक आवाज ऐकू येणे, अकारण बडबड, मतिमंदत्व, विस्मरण,लहान मुलांमधील किंवा शालेय विद्यार्थ्यांमध्ये असलेले मानसिक ताण– तणाव या मानसिक आजारावर व समस्येवर मानसोपचार तज्ञांमार्फत मोफत तपासणी, औषधोपचार व समुपदेशन केले जातील. ज्या ठिकाणी रूग्णांची पुर्वी उपचार घेतलेल्या सर्व रिपोर्ट घेऊन येणे गरजेचे असेल संबंधित समस्या व आजार असलेल्या जनतेने या शिबिराचा लाभ घ्यावा असे डॉ. निळकंठ भोसीकर जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय नांदेड, डॉ. नरेश देवणीकर वैद्यकिय अधिक्षक उपजिल्हा रुग्णालय देगलूर, डॉ. संगीता देशमुख जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड व तसेच सर्व वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी उपजिल्हा रुग्णालय देगलूर यांची उपस्थिती लाभणार आहे.

# दिवंगत माजी खासदार बाळुभाऊ धानोरकर अभ्यासिका प्रेरणादायी ठरेल–प्रा.राजेश पेचे

## समीक्षा आखरे, नेहा आंबोरकर गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । दीपक कटकोजवार**

विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी लायब्ररी आणि अभ्यासिका अत्यंत महत्त्वाच्या ठरत आहेत. शहरात मोठ्या प्रमाणात खासगी लायब्ररी सुरू भाऊ असताना शासनाच्या लायब्ऱ्या मात्र दुर्लक्षित आहेत. मात्र भिवापूर वॉर्ड स्थित असलेल्या दिवंगत माजी खासदार बाळुभाऊ धानोरकर अभ्यासिका हे यासाठी अपवाद ठरले असून, पुढील काळात ही अभ्यासिका अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे प्रतिपादन प्राध्यापक राजेश पेचे यांनी केले.दिवंगत माजी खासदार बाळुभाऊ धानोरकर अभ्यासिकेच्या माध्यमातून दोन विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश



संपादन केले आहे. कुमारी समिक्षा राजेंद्र आखरे हिची सहाय्यक अभियंता म्हणून महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड मध्ये निवड झाली आहे. तसेच, कुमारी नेहा खुशाल आंबोरकर हिची भद्रावती तालुका आरोग्य पथकात एंटोमोलॉजिस्ट (एपीोश्रेसळीं) पदावर निवड झाली आहे.

या दोन्ही विद्यार्थिनींच्या सन्मानार्थ रविवार, ९ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता साई मंदिर मधील दिवंगत माजी खासदार बाळुभाऊ धानोरकर अभ्यासिकेच्या प्रशस्त हॉल मध्ये सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला नागरिक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी विविध मान्यवरांनी या विद्यार्थिनींच्या यशाचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान निवृत कार्यकारी अभियंता नरेंद्र बुरांडे यांनी भूषविले तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक राजेश पेचे, गणपर्व चॅरिटेबल ट्रस्ट,साई मंदीर भिवापूर वॉर्ड चंद्रपूर चे अध्यक्ष अशोक कोटकर, काँग्रेस अल्पसंख्यक नेते सोहेल रजा शेख, जिल्हा काँग्रेस महिला जिल्हाध्यक्षा सुनंदा धोबे, गुरुदेव सेवा मंडळ भिवापूर वॉर्ड महिला अध्यक्षा पुष्पा पायघन, माजी नगरसेवक गोपाल अमृतकर, माजी नगरसेवक राजेश आखरे, माजी नगरसेविका मंगला आखेर, नमस्ते चांदा फाउंडेशन चे सचिव गोविल मेहरकरे, नमस्ते चांदा फाउंडेशन चे कोषाध्यक्ष सागर महाडोळे, ड. गणेश अमृतकर, पांडूरंग आदे, संजू धोबे, योगेश देवतळे, सचिन किरणे, हर्षल विधाते, श्रेयस मैत्र यांची उपस्थिती होती.

# सावित्रीबाई फुले यांच्या १९८ व्या स्मृतीदिना निमित्त सावता परिषदेच्या वतीने अभिवादन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । सुनिल शिंदे**

भारतीय स्त्री मुक्तीच्या व स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या, प्रथम शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या१९८ व्या स्मृतीदिना निमित्त सावता परिषद या सामजिक संघटनेच्या वतीने आय टी आय येथील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पूर्णाकृती स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष तथा हिंगोली जिल्हा प्रदेश प्रभारी गोरखनाथ राऊत, माजी सभापती लक्ष्मणराव जाधव, रामचंद्र रासे, सखाराम शीतळे,सोनाजी राऊत,जिल्हा उपाध्यक्ष सुनिल शिंदे, महानगर अध्यक्ष बालाजी बनसोडे,जिल्हा प्रवक्ते मारोती शीतळे, युवा महानगर अध्यक्ष संदीप झांबरे, सोशल मिडिया जिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर गोरे, सुजित राऊत, रमेश लोखंडे,विष्णू चौधरी, राजू मोरे, इत्यादी समाज बांधव ज्येष्ठ नागरिक यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विज्ञानवादी संत रविदास महाराज यांची शेळगाव गौरी येथे जयंती साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

येथून जवळच आसलेल्या स्वछ गाव सुंदर गाव म्हणून शेळगाव (गौरी) ता.नायगांव येथे जगद्गुरु संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६२७ वी जयंती दिनांक ९ मार्च रोजी उत्साहात साजरी करण्यात आली असून यावेळी गुरु रविदास मंदिराची नियोजीत जागा या नामफलकाचे अनावरण उपस्थीत मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले आहे .

याप्रसंगी अ.भा.गुरु रविदास समता परीषदेचे जिल्हाध्यक्ष गंगाधर गंगासागरे , रामतिर्थ पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे , नागोराव पा. बावने,बाबुराव पा. शिंपाळे , गजानन पा. शिंपाळे , जयराम पा. बळेगाये , नारायण




जमादार , मारुती कानोले, नागोराव पा. शिपांळे आदींची प्रमुख उपस्थीती होती .येथील ग्रा.पं.चे सरपंच मनोहर तोटरे यांनी येथील सामाजिक प्रश्नाकडे लक्ष घालून गुरु रविदास मंदिर व सभागृह बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन दिल्याबद्दल जयंती मंडळाने अभिनंदनाचा ठराव पारीत केला तसेच नियोजित जागा नामफलकाचे अनावरण तसेच ध्वजारोहन मान्यवर मंडळींच्या हस्ते करण्यात आले तदनंतर अ.भा.गुरु रविदास समता परीषदेचे जिल्हाध्यक्ष गंगाधर गंगासागरे , पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे , नागोराव बावने , गजानन पाटील आदींनी येथे गुरु रविदास मंदीर व सभागृह निर्माण होण्याच्या दृष्टिकोनातून सविस्तर मार्गदर्शन केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रा.पं. सदस्य प्रतीनिधी लक्ष्मण कांबळे यांनी पुढाकार घेतला असून यावेळी माधव गंगासागरे , जयराम गंगासागरे , दत्ता पांडुरंग गंगासागरे ,दिगंबर गंगासागरे , चंद्रसेन गंगासागरे , राजेंद्र कांबळे , विठ्ठल गंगासागरे , तुकाराम गंगासागरे , लक्ष्मण करकले , रावजी करकले , संगीता कांबळे दुर्गा करकले , आशा गंगासागरे शालीनी गंगासागरे , धुरपतबाई करकले यांसह गावातील नागरीक मोठ्या संखेने उपस्थीत होते.

# आश्वासने अनेकांनी दिली परंतु रस्त्याच्या कामाला सुरुवात आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केली


अगोदरचा रस्ता


अत्ताचा रस्ता




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा | संतोष पाटील जाधव**

लोहा तालुक्यातील भोपळवाडी फाटा कलंबर खुर्द येथील श्री छत्रपती संभाजी महाराज चौक ते संगुचीवाडी बायपास कंधार लोहा रोड नांदेड बिदर हायवे बायपास येथील रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली होती मोठं मोठें खड्डे पडले होते.येथील नागरिकांनी व्यापाऱ्यांनी दैनिक लोकनेता पेपर मध्ये बातम्या लावून तेव्हाचे मुख्यमंत्री आताचे मा.ना.उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री सडक योजनेअंतर्गत या रस्त्याच्या कामाला सुरुवात केली होती.गिट्टी फोडून ठेवली होती, मुरुम टाकून खड्डे भरून घेतले होते परंतु विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने हे काम बंद पडले होते.पुन्हा नागरिकांनी व्यापाऱ्यांनी दैनिक लोकनेता पेपर मध्ये बातमी लावून लोकप्रतिनिधी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या कडे या रस्त्याची मागणी केली.तेव्हा कर्तव्यदक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांचे व कलंबर परिसरातील नागरिकांचे व्यापाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन लगेच ताबडतोब हा रस्ता डांबरीकरणाच्या कामाला सुरुवात केली असल्याने आमदार असावा तर प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्यासारखा असे या रस्त्याच्या कामाच्या माध्यमातून जनतेला आमदार साहेबांचे कर्तव्य दिसून आले आहे.उदगीर आगाराची एस टी बस व कंधार आगाराची एस टी बस बाहेरून बायपास मार्गे जात होती ती आता भोपाळवाडी फाटा श्री छत्रपती संभाजी महाराज चौक येथून पुढे जात आहे येत आहे.त्यामुळे लहान बालकांना, वृध्द लोकांना,दिव्यांगांना, महीलांची सोय झाली आहे. व्यापाऱ्यांचा व्यापार चालत असून प्रवाशांनाही चांगला फायदा झाला आहे.भोपाळवाडी फाटा कलंबर खुर्द येथील रस्त्याच्या कामाला ताबडतोब सुरुवात करून आमदार साहेबांनी परीसरातील नागरिकांच्या मनात घर निर्माण केले आहे तसेच परीसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मा.ना.अजित दादा पवार साहेब यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हे काम करण्यासाठी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या कडे मागणी लावून धरली होती.त्यामुळे साहेबांनी परीसरातील कार्यकर्त्यांच्या,नागरिकांच्या व्यावसायिकांच्या अडचणी लक्षात घेऊन ताबडतोब डांबरीकरणाच्या कामाला सुरुवात केली आहे.काम चालु असून नागरिकांमध्ये व्यापाऱ्यामध्ये कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे.


आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या कडे भोपाळवाडी फाटा येथील रस्ता दुरुस्त करून देण्याची नागरिकांची मागणी

गीट्टी उडून अनेक जणांचे फुटतात डोके म्हणून रस्ता करा मायबाप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड | गोविंद मोरे

नांदेड बिदर हायवे रस्त्यावरील कलंबर खुर्द पासून जवळच असलेल्या भोपळवाडी फाटा श्री छत्रपती संभाजी महाराज चौक येथील कंधार जाणारा रस्ता अत्यंत खराब झाला असून या ठिकाणी परिसरातील २५ ते ३० गावाच्या बाजारपेठेचे मुख्य ठिकाण आहे दर शनिवारी आठवडी बाजार सुध्दा भरतो .उदगीर आगाराची बस बाहेरून बायपास ने जात आहे तसेच कंधार आगाराची बस सुद्धा बाहेरूनच जात असल्यामुळे वृद्ध नागरिक महिला बालक, व्यापारी, कर्मचारी ,विद्यार्थी ,विद्यार्थिनी यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे . त्या बस गाड्या कलंबर फाटा किंवा संगुचीवाडी फाटा येथे थांबत आहे.त्यामुळे लोकनेते आ.प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब कंधार लोहा विधानसभा सदस्य यांच्याकडे कलंबर परिसरातील नागरिकांनी भोपळवाडी फाटा श्री छत्रपती संभाजी महाराज चौक ते नांदेड बिदर हायवे बायपास कंधार रोड .गीट्टी फोडून ठेवली असून ती गीट्टी उडून अनेक जणांचे डोके फुटले आहेत ,जीवित हानी होण्याची दाट शक्यता आहे कलंबर खुर्द भोपाळवाडी फाटा व परिसरातील ग्रामस्थांनी निवेदन देऊन माननीय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेबांना होईल तितके लवकर या रस्त्याची दुरुस्ती करून देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

दैनिक लोकनेता इफेक्ट

---

## जालना अर्थक्रांती अर्बन शाखेची यशस्वी वाटचाल

# जालना अर्थक्रांती अर्बनचा तिसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन | राम शिंदे**

जळगांव सपकाळ ता. भोकरदन येथील जालना अर्थक्रांती अर्बन चा तिसरा वर्धापन दिन साजरा करण्यात आला त्या प्रसंगी गावातील मा.जि. प. सदस्य, सरपंच, उपसरपंच, सोसायटी चेअरमन, सदस्य,ग्रामपंचायत सदस्य व माजी सरपंच सदस्य वरिष्ठ मंडळी व संचालक मंडळ,व कर्मचारी यांची उपस्थिती होती.या प्रसंगी संस्थेची वाटचाल व आर्थिक उलाढाल जी. एस. सपकाळ सर, व संस्थेचे अध्यक्ष श्री।आर.ए.रोजेकर सर यांनी मांडली ग्रामीण भागात सर्व संस्थेची ऑनलाईन सुविधा संस्थेची असून दानापूर येथे दुसरी शाखा असून अजून अन्य ठिकाणी सुद्धा संस्थेची शाखा टाकणार आहे .संस्थेच्या सर्व सुविधा प्रत्येक घरापर्यंत पोहोचवून नाविन्यपूर्ण बँकिंग योजनेचा लाभ सभासदांना देऊन, विश्वास सार्थ ठरवून कायम जनतेच्या सेवेला हाकेला उपलब्ध म्हणून संस्थेची ओळख कायम ठेवू तसेच सर्वांनी संस्थेचे सोबत जुडून राहण्याचे सांगण्यात आले ठेवीदार, कर्जदार, शेतकरी बांधव, सामाजिक राजकीय व्यापारी, वैद्यकीय, शैक्षणिक क्षेत्रातील बांधवाच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

**ग्रामीण भागात सर्व संस्थेचे ऑनलाइन सुविधा संस्थेशी असून दानापूर**



**येथे दुसरी शाखा असून अजून अन्य ठिकाणी सुद्धा जालना अर्थक्रांती अर्बनच्या शाखा उघडणार संस्थेच्या सर्व सुविधा घराघरापर्यंत पोचून नाविन्यपूर्ण बँकिंग योजनेचा लाभ सभासदांना देऊन विश्वास सार्थ ठरवून कायम जनतेच्या सेवेत राहील व तसेच ठेवीदार कर्जदार शेतकरी बांधव सामाजिक राजकीय व्यापारी वैद्यकीय शैक्षणिक क्षेत्रातील बंधू वर्गांचे आभार व्यक्त केले संस्थेचे अध्यक्ष श्री आर. ए. रोजेकर**





---



नांदेड दक्षिण चे आमदार आनंदराव पाटील बोढारकर व नांदेड दक्षिण जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे यांच्या नेतृत्वाखाली उबाठा शिवसेनेच्या महिला पदाधिकारी स्मिता कुलकर्णी, यांनी मा.ना.एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेत पक्ष प्रवेश केला यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला(छाया–बालाजी शिंदे)

---

# मा.ना.नितीनजी गडकरी यांच्या कंपनी तर्फे लोकनेते मारोतराव कवळे गुरूजी सन्मानित



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पाटील**

केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी साहेब यांच्या मानस ॲग्रो इंडस्ट्रीयस अँन्ड लिमिटेड देव्हाडा जि.भंडारा येथे नायगाव विधानसभा मतदार संघांचे शेतकरी नेते मा.मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी सदिच्छा भेट दिली असता यावेळी लोकनेते मारोतराव कवळे गुरुजी यांचा सन्मान करतेवेळी तेथिल श्री.पद्माकर वैद्य (शेतकी अधिकारी),श्री.रामेश्वर टोपले (ऊस विकास अधिकारी),श्री.रवींद्र कटारे (ऊस पुरवठा अधिकारी),श्री.आनंद मेश्राम (पॅनयार्ड सुपरवायझर)श्री.रिषभ मोरे, हुंडा (गं.प) येथील चेअरमन श्री.देवदास पाटील थेटे ठेकेदार,श्री.देविदास जोंधळे* यांच्यासह आधी जण उपस्थित होते.

---

# कोरपना तालुक्यातील १३ तर जिवती तालुक्यातील ८ गावांच्या सामूहिक वनहक्क संवर्धन व व्यवस्थापन आराखडयांना मंजुरी

## तालुका स्तरीय कन्व्हर्जन्स समितीच्या बैठकीत निर्णय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कोरपना | प्रदिप मडावी**

अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ आणि सुधारित नियम २०१२ अन्वये अनुसूचित जमाती व इतर परंपरागत वन निवासी यांना कलम ३ (१) अन्वये वैयक्तिक व सामुहिक किवा दोहोंचे धारनाधिकार मिळण्याचे अधिकार प्राप्त झालेले आहेत. अनुसूचित जमातीचे वन निवासी व इतर पारंपारिक वन निवासी यांच्या उत्थानासाठी सामुहीक वन संपत्तीचे निरंतर व समसमान




संवर्धन आणि व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामसभेचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच वनांवर उपजीविका अवलंबून असलेल्या ग्रामीण समाजाला निरंतर व शाश्वत उपजीविका उपलब्ध करून देणे, वनांचे व नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन, संरक्षण व पुनर्निर्मानाकरिता परिणामकारक व कार्यक्षम व्यवस्थापन पद्धत अवलंबिणे आवश्यक आहे.

सामुहिक वन हक्क व्यवस्थापन समिती व ग्रामसभेने संवर्धन व व्यवस्थापन आराखडे तालुका स्तरीय कन्व्हर्जन्स समिती कडे सादर केले होते, याकरिता एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प विभाग, चंद्रपूर कार्यालया अंतर्गत तालुका जिवती तसेच तालुका कोरपना येथे मंगळवार ला तहसील कार्यालयात तालुका कन्व्हर्जन्स समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती, सदर बैठकीत जिवती तालुक्यातील सामुहिक वनहक्क प्राप्त ८ ग्रामसभांच्या तसेच कोरपना तालुक्यातील सामुहिक वनहक्क प्राप्त १३ संवर्धन व व्यवस्थापन आराखड्यांना अंतिम मंजुरी देण्यात आली आहे.सदर बैठकित तालुका स्तरीय कन्व्हर्जन्स समितीचे सदस्य, ग्रामसभा प्रतिनिधी तसेच स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी प्रामुख्याने उपस्थित होते.

---

# मुख्याधिकारी साहेब गोंडपिपरीतील हा अर्धवट रस्ता पूर्ण करा

## शामराव रामगीरकार व नागरिकांनी केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गोंडपिपरी | आशिष आ. निमगडे**

गोंडपिपरी नगरात सध्या विविध समस्या आहेत.येथील प्रभाग क्र.८ ते ९ या क्षेत्रात मोडणा–या प्रकाश तन्नीरवार ते सुनील फुलझेले यांच्याघरापर्यंत येत असलेल्या रस्ता हा अर्धवट आहे.गेल्या तिस वर्षापासून हा प्रश्न प्रलंबीत आहे.त्यामुळे येथील नागरिकांना मोठाच त्रास सहन करावा लागत आहे.त्यामुळे प्रशासनाने नागरिकांची हि समस्या तातडीने सोडवावी अशी मागणी गोंडपिपरी येथील सामाजिक कार्यकर्ते शामराव रामगीरवार यांनी केली आहे.यासंदर्भात त्यांच्या नेतृत्वात नुकतेच मुख्याधिकारी विवेक चौधरी यांना निवेदन



सादर करण्यात आले.

गोंडपिपरी येथील प्रभाग क्रमांक ८ व ९ या प्रभागात सध्या नागरिकांना ब–याच समस्यांचा सामना करावा लागत आहे.या परिसरात अनेक गरीब नागरिकांना घरकूल मंजूर झाले आहे.पण या परिसरातील मार्ग हा अर्धवट असल्याने त्यांना अडचण होत आहे.हा मार्ग पूर्ण काढावा याकरिता गेल्या तिस वर्षापासून नागरिक मागणी करित आहेत.पण प्रशासन व सत्ताधा–याचे याकडे पुर्णपणे दुर्लक्ष होत आहे.आता या मागणीला घेत नागरिक आक्रमक झाले आहेत.प्रभागातील सामाजिक कार्यकर्ते शामराव रामगीरवार यांच्या नेतृत्वात प्रशासनाला निवेदन देण्यात आले.सोबत हा अर्धवट मार्ग पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.यावेळी जेष्ठ नेते शैलेशसिंह बैस,मोरेश्वर मडावी,महादेव शेडमाके,सईबाई सिडाम,प्रविण सिडाम,सुनील शेडमाके,कमलाकर आत्राम,विनायक मडावी,यांचा शिष्टमंडळात समावेश होता.

---

# अवैध वृक्षतोड करणाऱ्यावर तात्काळ कार्यवाही करावी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**निलंगा | इस्माईल महेबूब शेख**

निलंगा तालुक्यातील मौजे. नणंद येथे हजारो झाडाची कत्तल ही बेकायदेशीररित्या केली जात असून या संदर्भात संबंधितावर तात्काळ कार्यवाही करावी अशी मागणी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी वन अधिकाऱ्याकडे केली आहे.

निलंगा तालुक्यातील मौजे . नणंद,तालुका– निलंगा, जिल्हा– लातूर येथील नणंद वनपरिक्षेत्रात बेकायदेशीर हजारो वृक्षाची तोड चालू आहे. ढड ३० ढ३२४५ या क्रमांकाच्या ट्रकमध्ये तोडलेले हजारो लाकडे कामगार लोड करत आहेत.




वन विभागाच्या परिसरात गोविंद चव्हाण हा कर्मचारी सुद्धा येथे थांबला होता. कामगारांना व कर्मचाऱ्यास विचारणा केली असता आम्हाला काहीही माहिती नाही. आम्ही कामगार आहोत आम्ही धाराशीवचे आहोत असे त्यांनी सांगितले. संबंधित वृक्षतोड करणाऱ्या गुत्तेदार व कामगारास विचारणा केली असता ते काहीही उत्तर देत नाहीत. वृक्षतोड करण्यासंबंधी काही पत्र आहे का अशी विचारणा केली असता गप्प बसत आहेत. अशा बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्या व्यक्तीवर व संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी वनाधिकाऱ्याकडे पत्राद्वारे केली आहे.

# स्त्रीने स्वतःचे अस्तित्व टिकून समाजाला पुढे न्यावे-डॉ.नाईक

लोकनेता न्यूज नेटवर्क

भोकर । रमाकांत जोशी

प्रत्येक स्त्रीने आपले अस्तित्व कायम टिकवुन समाजाला पुढे नेण्याचे कार्य करावे असे विचार भोकर येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ.अनिता राम नाईक यांनी दिनांक ८ मार्च रोजी शासकीय मुलीचे वस्तीगृह भोकर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा भोकर च्या वतीने आयोजित जागतिक महिला दिनाच्या औचित्याने विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा सन्मान सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना व्यक्त केले.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ए.पी.आय.कल्पना राठोड,बालरोग तज्ञ डॉ. प्रभा केंकरे,प्राचार्य अंबिका जाधव,सामाजिक कार्यकर्त्या नीता माळी,नगरपरिषद कर्मचारी प्राजक्ता हापसकर,पत्रकार ज्योती सरपाते,
क्रिडा प्रशिक्षक पार्वती चव्हाण,राष्ट्रीय खेळाडु राणी जाधव आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर,राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

त्यानंतर उपस्थित विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांचा पत्रकार संघातर्फे,शाल,साडी, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की प्रत्येक स्त्रीने आपल्या जीवनात उत्तम संस्कारांची जाणीव ठेवून पवित्र जीवन जगावे. कारण आपण या भारत भूमीच्या पावन धरतीत जन्म घेतला आहे याचं भान आपणाला असने गरजेचे आहे. प्रत्येकाने स्वतःच्या पायावर उभे राहून सन्मानाने जीवन जगायचे आहे. जीवनात ध्येय निश्चित ठरवून त्याला गवसणी घालण्याचे प्रयत्न सर्वांनी करावेत आणि स्वतःत असलेले सद्गुण ओळखून त्या गुणांची नेहमी प्रगती करत राहावी असे सांगितले.

या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या नीता माळी यांनी सांगितले की प्रत्येक स्त्रिकडे दैवी शक्ती



आहे तेव्हा समोरचा माणूस कसा आहे हे ओळखण्याची ताकद आपणाला भगवंतांनी दिलेली आहे त्याचा अवलंब करा.एकमेकीचा आदर करा,कोणाचाही द्वेष करू नका.सर्वांना सोबत घेऊन नेटाने पुढे जा असे सांगितले. प्राचार्या अंबिका जाधव यांनी बोलताना सांगितले की येणाऱ्या प्रत्येक संकटाला आत्मविश्वासाने समोर जा विजय तुमचाच आहे तर डॉ.प्रभा केंकरे यांनी स्त्री ही दोन कुटुंबे घडवण्याचे पवित्र कार्य करीत असते त्यामुळे ती संस्कारित व शिक्षित होणे गरजेचे आहे असे सांगितले.

ए.पी.आय.कल्पना राठोड यांनी सांगितले की महिला ही उपजतच खास आहे.तेव्हा आपलं जीवनही खासच असलं पाहिजे.चुकीची संगत व चुकीचे पाऊल पडू देऊ नका.आपला जन्म फक्त चूल आणि मूल एवढ्यासाठीच नाही तर आपण मनात आणलो तर आकाशालाही गवसणी घालू शकतो ही ताकद ईश्वराने आपणाला दिलेली आहे. तेव्हा या ईश्वर दत्त मिळालेल्या गुणांचा सर्वांनी सदुपयोग करून घ्यावा असे सांगितले.पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष बालाजी नार्लेवाड यांनी आपल्या मनोगतात स्त्री ही केवळ भोगदासी नसून ती भगवंतांने निर्माण केलेली एक उत्कृष्ट कलाकृती आहे.तेव्हा समाजाने तिच्याकडे सदैव पूजनीय दृष्टीनेच पाहिले पाहिजे. यंत्र नारेस्तु पूजते तत्र रमते देवता ही आपली संस्कृती आहे.ज्या समाजात नारींचा मानसन्मान आहे त्याच समाजात उज्वल संतती जन्माला येत व तोच समाज सुसंस्कृत जीवन जगू शकतो असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संघाचे सल्लागार सुधांशू कांबळे सर यांनी केले तर आभार संघाचे सचिव कमलाकर बरकमकर यांनी मांनले.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष विजय चिंतावार, कार्याध्यक्ष सारंग मुंदडा,उपाध्यक्ष विठ्ठल सुरलेकर,कोषाध्यक्ष रमाकांत जोशी व सर्व पदाधिकाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

### जांभळी येथे आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

# जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते आयुष्यमान कार्डचे वाटप

लोकनेता न्यूज नेटवर्क

भोकर । रमाकांत जोशी

जागतिक महिला दिन च्या दुसर्या दिनी तालुक्यातील जांभळी तांडा येथे दि.९ मार्च रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख व तालुका आरोग्य अधिकारी डॉ संदेश जाधव यांच्या सुचनेनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र भोसी अंतर्गत पांडुरणा उप आरोग्य केंद्राच्या वितीने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

पांडुरणा उप केंद्रा अंतर्गत येणाऱ्या व अतिशय दुर्गम आणि डोंगराळ भागात असलेले जांभळी ह्या गावात आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याने शेतकरी व कामगार नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन जिल्हा आरोग्य अधिकारी





संगीता देशमुख यांच्या सुचनेनुसार तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संदेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्याची जांभळी या गावामध्ये मा.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख मॅडम व तालुका आरोग्य अधिकारी डॉ संदेश जाधव सर यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन केले होते.या शिबिरामध्ये महिला दिनाच्या औचित्य साधून महिलांची विशेष आरोग्य तपासणी करण्यात आली या मध्ये गरोदर माता,स्तनदा माता,एन.सी.डी.स्क्रीनिंग,सिकल सेल,एच.बि टेस्ट, एच.आय. व्हि व ईतर सर्व रक्त तपासण्या करण्यात आल्या व जवळपास ३० नागरिकांचे आयुष्मान योजनेचे कार्ड काढुन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या हस्ते वितरित करण्यात आले.या शिबिरात प्रा.आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी डॉ.शिवानी राठोड व पांडुरणा आरोग्य उप केंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी डॉ जगदीश राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सेविका जाधव बी एस,आरोग्य सेवक साईनाथ माकूरवार व उपकेंद्र पांडूर्णा सर्व टिम यांनी तपासणी केली.हे शिबीर यशस्वी करण्यासाठी सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, लॅब असिस्टंट,आशा वर्कर, अंगणवाडी सेविका,व ग्रामपंचायत जांभळी यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

# शिराढोण येथे मुस्लिम बांधवांच्या वतीने इफ्तार पार्टी



लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । दौलत पांडागळे

कंधार तालुक्यातील शिराढोण येथील मुस्लिम बांधवानी रमजान च्या पवित्र महिन्यात गावातील सर्व धार्मिय लोकांना एकत्र बोलवून त्यांचे मौलाना यांनी रमजान एक पवित्र महिना त्याचे काय महत्व असते, रोजाचा उद्देश काय, कुरान या ग्रंथाचा रमजानशी काय संबंध या विषयावर माहिती सांगितली व सर्व धर्मीय बांधवाना इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करून सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न करून राष्ट्रीय एकात्मता, मानवीय एकता, बंधुता आणि समतेचा संदेश दिला यावेळी शिराढोण ग्रामपंचायत चे सरपंच खुशाल पा. पांडागळे,व्यंकटराव पा. पांडागळे माली पाटील,साईनाथ पा. कपाळे ग्राम पंचायत सदस्य, सदाशिव देवणे तंटामुक्ती अध्यक्ष,ग्राम पंचायत सदस्य धर्माजी कपाळे, खमरोदिन मुंजेवार,शिवाजी चौडम, सूर्यकांत आळने, सर्व पत्रकार व गावातील नागरिक उपस्थित होते.

# दिशा बहुउद्देशीय संस्था चंद्रपूरच्या वतीने जागतिक महिला दिन कर्तृत्ववान महिलांच्या सत्काराने साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

चंद्रपूर । दीपक कटकोजवार

चंद्रपूर येथील दिशा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने ८ मार्च ला जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व कामगार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तुत्वान महिलांचा सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम समाजसेविका सौ. बेबीताई उईके यांच्या अध्यक्षतेखाली बापट नगर येथे संस्थेच्या अध्यक्षा पूजाताई शेरकी यांनी आयोजित केला.

कार्यक्रमाचा प्रारंभ राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीप प्रज्वलनाने करण्यात आला.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून संजीवनी कुबेर , किरण बुटले, सुनिता गायकवाड अनु खान मॅडम, अनुताई दहेगावकर, सरिता मालू संस्था उपाध्यक्षा रेखा जाधव आदी नी महिलादिना निमित्त विचार व्यक्त केले. सामाजिक,राजकीय, शैक्षणिक व साहित्यिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तुत्वान महिला पीएसआय.



लता सुटकर, गीता येरेवार पोलीस विभाग, मंजुषा दरवडे कवयित्री, अनु स्पोकन च्या डायरेक्टर अन्नुखान मॅडम, पुनम झा शिक्षिका , नॅचरोपॅथी डॉ.जयश्री बुटे ,.नॅचरोपॅथी डॉ. सीमा वनकर ,सुनिता घाटुले, वसुंधरा कांबळे, स्वाती बेतावार ,नंदनी घाटे, वंदना घोटकर प्रमिला बावणे रणजीता सातपुते, कविता बोंबले, आदींना सन्मानचिन्ह व बुके देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.याप्रसंगी अध्यक्षस्थानी असलेल्या सौ. बेबीताई उईके म्हणाल्या की, महिलांनी प्रत्येक क्षेत्रामध्ये सक्षमपणे उभे राहून अन्याय,अत्याचाराच्या विरोधात लढा लढण्याची ताकद ही महिलांमध्ये असायला पाहिजे. जोपर्यंत महिला आवाज उठवणार नाही तोपर्यंत महिला वरील अत्याचार हे वाढत जाईल , क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारं उघडली आणि त्यामुळेच आज आपण प्रत्येक क्षेत्रामध्ये पुरुषाच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात कार्यरत आहोत हे सावित्रीबाई फुले यांच्यामुळेच,समाजातली विषमता, विकृत मानसिकता व महिलांवर होत असलेले अन्याय अत्याचार दूर करण्यासाठी महिलांनी एकत्रित येऊन संघटित होणे गरजेचे आहे तरच महिलांना न्याय मिळेल.याप्रसंगी दिशा बहुउद्देशीय संस्थेच्या कविता बंडीवार, संजीवनी चौधरी, संजीवनी शेरकी, राणी नवघरे आशा नवघरे, बासुंदी ,संस्थेच्या पदाधिकारी उपस्थित होत्या. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

# राशन कार्ड धारकांनी त्वरित ई केवायसी करावे तहसीलदार उमरी यांचे नागरीकांना आव्हान!

लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरी । किशन गायकवाड

उमरी तालुक्यातील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत प्राधान्य कुटुंब लाभार्थी योजना व अंत्योदय अन्न योजनेतील शिधापत्रिका धारकांना शासकीय अनुदानित अन्न धान्याचा लाभ चालू ठेवण्याकरीता राशन कार्ड मध्ये नांवे असलेल्या सर्व सदस्यांनी दि .३१/०३/२०२५ पर्यंत ई केवायसी करणे बंधनकारक आहे. उमरी तालुक्यांत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजने अंतर्गत प्राधान्य कुटुंब योजना व अंत्योदय अन्न योजनेतील एकुण ६७०८७ एवढे लाभार्थी असुन त्यापैकी ४६५१४ लाभार्थ्यांची ई केवायसी पुर्ण झाली असून २४५७३ लाभार्थींची ई केवायसी पुर्ण करणे अजूनही बाकी आहे. अशी माहिती तालुका पुरवठा निरीक्षक अधिकारी सचिन नन्नावरे यांनी दिली असून ज्या सदस्याचे ई केवायसी दिलेल्या मुदतीत पुर्ण झाले नाहीत त्यांचे अन्नधान्य बंद होणार आहे. तरी सदरील कुटुंबांतील व्यक्तींचे नांवे शिधापत्रिका मध्ये आहेत अशा सर्व सदस्यांनी आपल्या जवळच्या रास्तभाव दुकानदाराशी तात्काळ संपर्क





साधुन आपले ई केवायसी पुर्ण करुन घ्यावे. ई केवायसी करण्यासाठी शिधापत्रिकेत नांवे असणा-यांनी रास्तभाव दुकानात स्वतः जाऊन ई पॉस मशिनवर बायोमैट्रिक अथेटिकेशन अंगठा करून प्रमाणिकरण पुर्ण करावे. असे आवाहन प्रशांत थोरात तहसीलदार उमरी यांनी केले आहे. तर बाहेर गावी असलेल्या व्यक्तीला रास्त भाव दुकानांवर जाने शक्य होत नसेल तर शासनाने दिलेल्या Mera Mera E kyc mobile app आणि. Adhar face RD service APP हे मोबाईल ऐप सुरू केले आहे.यामुळे छत्रड- लाभार्थी राशन दुकानांत न जाता ही स्वतः चे आणि कुटुंबातील सदस्यांचे ए झूल काही क्षणातच मोबाईल वरून पुर्ण करण्याची संधी देण्यात आली आहे. प्रशांत थोरात तहसीलदार उमरी यांनी ई केवायसी करण्याची पद्धत पुढील प्रमाणे सांगितले आहे. सर्वप्रथम Google Play Store वरून Mera E kyc mobile app आणि Adhar face RD service APP हे दोन्ही ऐप Download करून Install करावे.त्यानंतर Mera E kyc mobile app ' उघडून त्यात राज्य निवडावे व आधार क्रमांक प्राविष्ट करावा त्यानंतर आधारशी लिंक असलेल्या मोबाईल वर एक जढ्ज येतो. तो OTP त्यात प्राविष्ट करावा त्यानंतर Face झूल बटनावर क्लिक करून मोबाईलच्या शेल्फी उराशीर द्वारे आपली शेल्फी घेतांना डोळ्यांची उघड- झाप व आपल्याला ए झूल पुर्ण झाल्याचा संदेश प्राप्त होतो. ई केवायसी पुर्ण केले नाही तर धान्य बंद झाल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधित लाभधारकावर राहील. तहसीलदार उमरी यांनी जनतेला असे जाहीर आवाहन केलेले आहे. ई केवायसी करीता आवश्यक लागणारे कागदपत्र : १) लाभार्थ्यांचे आधार कार्ड २) रेशनकार्ड इत्यादी सोबत घेऊन जावे अशी माहिती पुरवठा निरीक्षण अधिकारी सचिन नन्नावरे उमरी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

**मार्कमेमो सनद रहिवासी,जातंप्रमाणपत्र हरवले आहेत**

माझी आम्रपाली कांताराव गायकवाड या नावाची इ.१० वी पास मार्कमेमो व सनद आणि इ.१२ वी पासची मार्कमेमो व सनद तसेच डोमासाईल व एसी जात प्रमाणपत्र भोकर ते नांदेड प्रवासात हरवलेली आहेत तरी कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा ही विनंती

– संपर्क पत्ता–
आम्रपाली कांताराव गायकवाड
समतानगर भोकर ता.भोकर जि.नांदेड
मो.न.९१३०९९४८६७

# जि.प.प्राथमिक शाळा अजनीवाडी येथे जागतिक महिला दिन साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

लातूर । विष्णू मोहन पोले

: अहमदपूर तालुक्यातील अजणेवाडी येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. महिला दिनानिमित्त गावातील मुलींना उच्च शिक्षण देणाऱ्या मातांचा तसेच निपुण भारत अंतर्गत काम करणाऱ्या लीडरमातांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित सर्व पालकमातांना निपुण भारत ही प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक मटवाड माधव व सहशिक्षिका शिला वाडेकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अंगणवाडी कार्यकर्ता पार्वती येलगटे व मीरा गोमारे यांनी सहकार्य केले. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांच्या अनेक माता उपस्थित होत्या.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904